मंगळवार दि. १३ ऑक्टोबर २०२६ ● जालना ● वर्ष ८ वे ● अंक ४१ वा ● किंमत २ रु. ● पाने ०४
8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

अविघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता. जाफ्राबाद जि. जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL टेंभुर्णी ता. जाफ्राबाद जि. जालना (मेन रोड)
एका छताखाली आरोग्य सेवा
डॉ. आनंद मान्ने Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

## फेब्रुवारी अखेरपर्यंत मा बागेश्वरी साखर कारखाना सर्व ऊस उचलणार- चेअरमन शिवाजीराव जाधव

### सन २०२६-२७ च्या गळीत हंगामाचा गव्हाणीत मोळी टाकून शुभारंभ; यंदा ३१०० रुपये प्रति मेट्रिक टन दर केला जाहीर

**परतुर - प्रतिनिधी**

फेब्रुवारी अखेरपर्यंत बिगर नोंदी सह बागेश्वरी साखर कारखाना सर्व ऊस उचलणार असून यंदा ३१०० रु. प्रति मे. टन दर देणार असल्याची माहिती चेअरमन शिवाजीराव जाधव यांनी सन २०२६-२७ च्या गळीत हंगामाचा बॉयलर प्रदीपन करून व गव्हाणी मध्ये मोळी टाकून शुभारंभ करताना दिली. बागेश्वरी साखर कारखान्याचा सन २०२६-२७ चा शुभारंभ चेअरमन शिवाजीराव जाधव यांच्या हस्ते बॉयलर प्रदीपन व गव्हाणी मध्ये मोळी टाकून करण्यात आला. यावेळी प्रमुख उपस्थितीत कार्यकारी संचालक अजय जाधव हे होते. यावेळी पुढे बोलताना चेअरमन शिवाजीराव जाधव म्हणाले की, मागील हंगामातील तिसरा हप्ता २०० रुपयाप्रमाणे येत्या गुरुवार शुक्रवार या दोन दिवसात



शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा होईल तर यावर्षी उसाचा प्रति मे. टन दर हा ३१०० रुपये देण्यात येणार आहे पहिला हप्ता २७०० रुपये प्रमाणे देण्यात येईल. दुसरा हप्ता २०० रु.खरिपाच्या पेरणी वेळी तर तिसरा हप्ता २०० रु. प्रमाणे पुढील हंगामाच्या सुरुवातीला देण्यात येणार आहे. शेतकऱ्यांचा नोंदी असलेला व बाजार नोंदी असलेला सर्व ऊस कारखाना गाळपास आणणार आहे. तरी शेतकऱ्यांनी इतर कारखान्यांना ऊस देण्याची घाई करू नये. पाऊस नसल्यामुळे शेतकऱ्यांचे हित लक्षात घेता यावर्षी कारखाना लवकर सुरू करण्यात आला आहे. तरी आपल्याच कारखान्यास ऊस देऊन सहकार्य करावे असेही आव्हान शेवटी शिवाजीराव जाधव यांनी केले. यावेळी संचालक अजय शिवाजीराव जाधव शेतकरी राजेंद्र तौर, संतोष दिंडे, जनरल मॅनेजर आर.आर. निर्वळ, वर्क्स मॅनेजर सोपान मोरे, मुख्य शेतकी अधिकारी पी.टी.खंदारे, चीफ केमिस्ट मधुकर कच्छवे,डिस्लरी मॅनेजर सचिन आव्हाड,चिफ इंजिनीयर गजानन जाधव वाहन मॅनेजर सुंदराव देशमुख, डेप्युटी इंजिनियर निखिल बोराटे, डेप्युटी चिफ केमीस्ट कैलास नेमाने, इलेक्ट्रॉनिक इंजीनियर संजय सिंग, विठ्ठलराव बागल, स्टोअर किपर समाधान सपकाळ टाईम ऑफिसर महादेव मोरे, केनयार्ड सुपरवायझर ज्ञानेश्वर देशमुख,परचेस विभाग प्रमुख मुंगळे, राहुल माने, खाजा पटेल, रमेश पौळ, अनिल पाटील ऊसपुरवठा अधिकारी प्रभाकर काळदाते, रघुवीर शिंदे सुरक्षा अधिकारी भोसले, खरात, सह शेतकरी उपस्थित होते.

## वैद्यवडगाव शिवारात गांजाची शेती उघड; ४१ किलो ओला गांजा जप्त!




**जालना । प्रतिनिधी**

जिल्ह्यात अवैध गांजाची लागवड आणि अंमली पदार्थांच्या गैरव्यवहाराविरोधात पोलिसांनी कारवाईचा बडगा उगारला असून, मंठा तालुक्यातील वैद्यवडगाव शिवारात गांजाची लागवड केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. सेवली पोलीस ठाणे आणि जालना येथील अंमली पदार्थविरोधी पथकाने संयुक्तरीत्या छापा टाकून तब्बल ४१ किलो वजनाची ओली गांजाची झाडे जप्त केली. या मुद्देमालाची किंमत १६ लाख ४० हजार रुपये असल्याचे पोलिसांनी सांगितले. या प्रकरणी दिनकर दत्ताराव वैद्य (वय ५०, रा. वैद्यवडगाव, ता. मंठा, जि. जालना) याला ताब्यात घेण्यात आले असून, सेवली पोलीस ठाण्यात अंमली पदार्थविरोधी कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**गुप्त माहितीच्या आधारे शेतात छापा**

पोलीस सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, सोमवार (पान २ वर)

## जालन्यात 'विकसित भारत २०४७ संकल्प सभा उत्साहात, सेवा ज्योती यात्रेतून राष्ट्रसेवेचा निर्धार

### *सेवा हाच धर्म, विकसित भारत हेच ध्येय - माजी मंत्री डॉ. भागवत कराड*

### *जनतेचा विश्वास हीच मोदीजींची खरी शक्ती - जिल्हाध्यक्ष भास्कर दानवे*

**जालना - प्रतिनिधी**

जनतेचा विश्वास हीच प्रेरणाशक्ती मानून आदरणीय पंतप्रधान नरेंद्र मोदीजी यांनी आपल्या राजकीय प्रवासाला सुरुवात केली. जनसेवेच्या या प्रवासाला आज २५ वर्षे पूर्ण झाली आहेत. त्यांच्या या प्रदीर्घ आणि प्रेरणादायी सेवाप्रवासानिमित्त भाजपाच्या वतीने देशभरात सेवा संकल्प अभियान राबविण्यात येत आहे. याच अभियानांतर्गत



भाजपा जालना महानगर च्या वतीने आयोजित विकसित भारत २०४७ संकल्प सभा दि. ०७ ऑक्टोबर २०२६ रोजी स्वातंत्र्यवीर सावरकर चौक, जालना येथे मोठ्या उत्साहात भाजपा जालना महानगर जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. या वेळी मार्गदर्शन करताना माजी मंत्री डॉ. भागवत कराड बोलत होते. व्यासपीठावर महापौर वंदना मगरे, उपमहापौर राजेश राऊत, रामेश्वर पाटील भांदरगे, जिल्हा सरचिटणीस अमोल कारंजेकर, सुनील पवार, शिवप्रकाश चितळकर, अरुणा जाधव, वसंत शिंदे, मंडळ अध्यक्ष सुनील खरे, संजय डोंगरे, अमोल धानुरे, मोहन राऊत, महिला मोर्चा जिल्हाध्यक्ष शुभांगीताई देशपांडे, विमल आगलावे यांची प्रमुख उपस्थिती होती. पुढे बोलताना ते म्हणाले की, पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांनी ७ ऑक्टोबर २००१ रोजी गुजरातचे मुख्यमंत्री म्हणून शपथ घेतली व आपल्या प्रशासकीय कामाला सुरुवात केली त्यांचा या प्रशासकीय प्रवासाला आज २५ वर्षे पूर्ण होत (पान २ वर)

## जालना जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालयात 'अभिजात मराठी भाषा सप्ताह' निमित्त ग्रंथप्रदर्शन संपन्न

**जालना - प्रतिनिधी**

राज्यात सर्वत्र ३ ते ९ ऑक्टोबर या कालावधीत साजऱ्या होत असलेल्या 'अभिजात मराठी भाषा सप्ताह'चे औचित्य साधून जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालय, जालना येथे भव्य ग्रंथप्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे. या प्रदर्शनाचे उद्घाटन जेईएस () कॉलेजचे प्रा. विलास जाधव यांच्या हस्ते उत्साहात पार पडले.




उद्घाटनप्रसंगी मार्गदर्शन करतांना प्रा. विलास जाधव यांनी स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांना 'अभिजात मराठी भाषा' या विषयावर सखोल मार्गदर्शन केले. ''स्पर्धा परीक्षेत यश मिळवण्यासाठी अभ्यासात नियमितता असणे अत्यंत आवश्यक आहे. तसेच विद्यार्थ्यांनी अभ्यासादरम्यान भ्रमणध्वनीचा (मोबाईल) वापर शक्य तितका कमी करावा,'' असा मोलाचा सल्ला त्यांनी या वेळी विद्यार्थ्यांना (पान २ वर)

## ०५ औरंगाबाद विभाग पदवीधर मतदारसंघ निवडणुकीसाठी जालना जिल्ह्यात पहिले प्रशिक्षण संपन्न

### जिल्ह्यातील ८९ मतदान केंद्रांवर होणार मतदान; ३३ हजार १९६ मतदार बजावणार मतदानाचा हक्क

**जालना - प्रतिनिधी**

०५-औरंगाबाद विभाग पदवीधर मतदारसंघ निवडणूक २०२६ च्या अनुषंगाने जालना जिल्ह्यातील निवडणूक यंत्रणेतील अधिकारी व कर्मचाऱ्यांचे पहिले जिल्हास्तरीय प्रशिक्षण शुक्रवार (दि. ९ ऑक्टोबर) रोजी जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन भवन येथे पार पडले. या प्रशिक्षणात निवडणूक प्रक्रियेतील विविध जबाबदाऱ्या, मतदान केंद्रांचे व्यवस्थापन, मतपेटी हाताळणी, सीलिंग तसेच आवश्यक विवरणपत्रे भरण्याबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.

०५-औरंगाबाद विभाग पदवीधर मतदारसंघ निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर करण्यात आला आहे. त्यानुसार २२ सप्टेंबरपासून संबंधित जिल्ह्यांमध्ये आदर्श आचारसंहिता लागू झाली आहे. या मतदारसंघात छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, हिंगोली, नांदेड, बीड, लातूर आणि धाराशिव या आठ जिल्ह्यांचा समावेश आहे. आदर्श आचारसंहितेचे सर्व संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांनी काटेकोरपणे पालन करावे, असे निर्देश उपजिल्हा निवडणूक अधिकारी यांनी यावेळी दिले .

*जालना जिल्ह्यात ८९ मतदान केंद्रे

जालना जिल्ह्यातील अंतिम मतदार यादीनुसार एकूण ३३ हजार १९६ मतदार मतदानाचा हक्क बजावणार आहेत. यामध्ये २६ हजार ७३२ पुरुष, ६ हजार ४६३ महिला आणि एका इतर मतदाराचा समावेश आहे. जिल्ह्यातील ८९ मतदान केंद्रांच्या प्रस्तावाला भारत निवडणूक आयोगाने ९ ऑक्टोबर २०२६ रोजी मान्यता दिल्याची माहिती प्रशिक्षणादरम्यान देण्यात आली.

तालुकानिहाय मतदान केंद्रे आणि मतदारसंख्या पुढीलप्रमाणे आहे.

जालना : २४ मतदान केंद्रे; ८ हजार ५७८ मतदार.

बदनापूर : ७ मतदान केंद्रे; २ हजार २४१ मतदार.

भोकरदन : १३ मतदान केंद्रे; ४ हजार ४०४ मतदार.

जाफ्राबाद : ७ मतदान केंद्रे; २ हजार ९५१ मतदार.

परतूर : ८ मतदान केंद्रे; ३ हजार २१८ मतदार.

मंठा : ५ मतदान केंद्रे; १ हजार ९२४ मतदार.

अंबड : १५ मतदान केंद्रे; ५ हजार ९६२ मतदार.

घनसावंगी : १० मतदान केंद्रे; ३ हजार ९१८ मतदार.

जालना जिल्ह्यात निवडणूक प्रक्रिया सुरळीत पार पाडण्यासाठी ४५ नोडल अधिकारी, ४५ झोनल अधिकारी, १०० मायक्रो ऑब्झर्व्हर आणि १०५ मतदान केंद्राध्यक्ष उपलब्ध करून देण्यात आले आहेत. या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी आपापल्या जबाबदाऱ्या योग्य प्रकारे पार पाडण्यासाठी प्रशिक्षणात विशेष मार्गदर्शन करण्यात आले. प्रशिक्षणा दरम्यान उपजिल्हाधिकारी (भूसंपादन) तथा नोडल अधिकारी श्रीमती मनिषा देशपांडे यांनी क्षेत्रीय अधिकाऱ्यांची कर्तव्ये आणि जबाबदाऱ्या यांची सविस्तर माहिती दिली. तसेच निवडणूक नायब तहसीलदार, घनसावंगी श्रीमती मोनाली सोनवणे यांनी मतदान केंद्राध्यक्ष आणि मतदान अधिकाऱ्यांच्या कर्तव्यांबाबत मार्गदर्शन केले. तसेच बदनापूर तहसील कार्यालयातील मास्टर ट्रेनर यांनी जम्बो मतपेटी हाताळण्याचे प्रत्यक्ष प्रात्यक्षिक (हँड्स-ऑन ट्रेनिंग) दिले. यावेळी मतपेटी हाताळणी व सीलिंगची प्रक्रिया समजावून सांगण्यात (पान २ वर)

## तुळजाभवानी मंदिरात घटस्थापना; पावसासाठी देवीला साकडे



**जालना - प्रतिनिधी**

जालना येथील तुळजाभवानी मंदिरात पाऊस पडू दे, शेतकऱ्यांचे संपूर्ण कर्ज माफ होऊ दे, सुशिक्षित बेरोजगारांना नोकऱ्या मिळू दे, शेतकऱ्यांना पिकांची संपुर्ण नुकसान भरपाई मिळवून दे आणि सर्वांना आनंदात राहता येऊ दे, अशा विविध प्रार्थना करीत घटस्थापना करण्यात आली. यावेळी देवीची विधिवत पूजा-अर्चा करून पावसासाठी देवीला साकडे घालण्यात आले. या घटस्थापना कार्यक्रमाला मॉ सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष बाबासाहेब शिवाजीराव वानखेडे (पान २ वर)

## राज्यस्तरीय सिनीयर टेनिक्काईट स्पर्धेसाठी निवड चाचणीचे आयोजन

**जालना -प्रतिनीधी**

टेनिक्काईट असोसिएशन, महाराष्ट्र यांच्या वतीने दिनांक ३०, ३१ ऑक्टोंबर ते १ नोव्हेंबर २०२६ दरम्यान वसई, पालघर येथे राज्यस्तरीय सिनीयर टेनिक्काईट अजिंक्यपद स्पर्धा २०२६-२७ चे आयोजन करण्यात आलेले आहे. सदर स्पर्धेत सहभागी होण्याकरीता जालना जिल्हा टेनिक्काईट असोसिएशनच्या वतीने दिनांक १३ ऑक्टोंबर २०२६ मंगळवार रोजी सकाळी ११ वाजल्यापासुन निवड चाचणीचे आयोजन जिल्हा क्रीडा संकुल, जालना येथे करण्यात आलेले आहे.



निवड चाचणीत सहभागी होण्याकरीता कोणतेही प्रकारचे शुल्क आकारण्यात येणार नाही. निवड चाचणीत सहभागी होण्यासाठी वयाचे बंधन नाही, सदर निवड चाचणीतुन जालना शहर जिल्हा करीता ६ मुले व ६ मुली व जालना ग्रामीण करीता ६ मुले व ६ मुली यांची निवड करण्यात येईल व हे खेळाडु राज्यस्तर स्पर्धेत जालना जिल्ह्याचे नेतृत्व करतील. टेनिक्काईट हा खेळ शालेय स्पर्धांमध्ये सहभागी असुन दहावी व बारावीत असणाऱ्या खेळाडुंना ग्रेस गुणांसाठी पात्र आहे.

अधिक माहितीकरीता संघटनेचे शेख चाँद पी.जे. मो.नं. ९८२२४५६३६६, अमोल काटकर, जिल्हा प्रशिक्षक उमेश खंदारकर, अमोल सोलाट, नागेश वराडे, तुषार गर्जे, अमोल सातपुते, गोवर्धन वाहुळ, श्रीमती शेख महेजबीन, श्रीमती गिता संगम, श्रीमती करूणा निरेवाड, वेदांत सोरटी यांच्याशी संपर्क साधावा.

तरी या सुवर्ण संधीचा जालना जिल्हयातील (पान २ वर)

## जिल्हाधिकाऱ्यांच्या पुढाकारातून कमिटीची यशस्वी मध्यस्थी; सातारा (वाहेगाव) येथील प्रलंबित रस्ता अखेर मोकळा!



**जालना - प्रतिनिधी**

परतूर तालुक्यातील मौजे सातारा (वाहेगाव) येथील अनेक दिवसांपासून प्रलंबित असलेला रस्ता व स्मशानभूमीकडे जाणारा मार्ग जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांच्या आदेशानुसार गठित करण्यात आलेल्या कमिटीच्या यशस्वी मध्यस्थीमुळे व केलेल्या कारवाईमुळे मोकळा झाला. यामुळे स्थानिक ग्रामस्थ व शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे.

मौजे सातारा (वाहेगाव) येथील शेत गट क्र. ११७ व ११८ ला ११४ मधून मुख्य रस्त्यापासूनचा सामाईक विहीर व श्मशानभूमी सर्व्हे नं. आणि गट नं. बांध, तसेच गट क्र. ११९/१४७ च्या बांधाने जाणारा रस्ता मागील काही दिवसांपासून बंद करण्यात आला होता. स्मशानभूमी आणि सामाईक विहिरीकडे जाणारा हा मुख्य मार्ग बंद असल्याने स्थानिक (पान २ वर)

## जालना जिल्ह्यातील ६०० क्षयरुग्णांना मिळणार कोरडा पोषण आहार; जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते प्रातिनिधिक वाटप

**जालना - प्रतिनिधी**

भारत सरकारच्या वर्ष २०३०पर्यंत 'क्षयरोग मुक्त भारत' करण्याच्या उद्दिष्टानुसार, प्रधानमंत्री टीबी मुक्त भारत अभियाना अंतर्गत जालना जिल्ह्यात सामाजिक बांधिलकी जपत एक स्तुत्य उपक्रम राबवण्यात आला आहे. रोटरी क्लब ऑफ जालना यांच्या पुढाकाराने आणि एस.आर.जी. पित्ती स्टील यांच्या सीएसआर () निधीतून जिल्ह्यातील उपचार घेत असलेल्या ६०० क्षयरुग्णांना कोरडा पोषण आहार किट पुरविण्यात आले आहेत.

या उपक्रमांतर्गत जिल्हाधिकारी कार्यालयातील प्रगती हॉल आज रोजी आयोजित एका विशेष कार्यक्रमात जालना



जिल्ह्याच्या जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांच्या हस्ते १० क्षयरुग्णांना प्रातिनिधिक स्वरूपात पोषण आहार किटचे वितरण करण्यात आले. उर्वरित रुग्णांना या किटचे वाटप तालुकास्तरावरून केले जाणार आहे. यावेळी एस.आर.जी. पित्ती स्टीलचे व्यवस्थापकीय संचालक मानस पित्ती, रोटरी क्लब ऑफ जालनाचे अध्यक्ष प्रशांत महाजन, रोटरी क्लब ऑफ जालनाच्या माजी अध्यक्षा वर्षा पित्ती, रोटरी क्लबचे सदस्य रमेश मगरे, चिराग तलरेजा आणि भारत भुतेकर यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ. जी. एम. कुडलीकर म्हणाले की, ''प्रधानमंत्री टीबी मुक्त भारत अभियानांतर्गत निक्क्षय मित्र म्हणून (पान २ वर)

# संपादकीय...

## सोलर प्लांटमधील चोऱ्या; केवळ चोर नव्हे, चोरीचा बाजारही उद्‌ध्वस्त करा!

जालना जिल्ह्यातील सौरऊर्जा प्रकल्पांमधून तांब्याच्या केबल आणि अन्य साहित्याची चोरी करणाऱ्या टोळीचा स्थानिक गुन्हे शाखेने पर्दाफाश केला. सोलर प्लांटमधील चोरीचे आठ गुन्हे आणि तीर्थपुरी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील एका बंद घरातील घरफोडी उघड झाल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे. चोरी करणाऱ्या संशयित आरोपीसह चोरीचा माल खरेदी केल्याचा आरोप असलेल्या तिघांना ताब्यात घेण्यात आले असून, मोठ्या प्रमाणात तांबे आणि अन्य मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. ही कारवाई निश्चितच महत्त्वाची आहे. मात्र, या घटनेने केवळ चोरांच्या टोळीचा प्रश्न समोर आणलेला नाही, तर चोरीचा माल खरेदी-विक्री करणारी यंत्रणा, सौरऊर्जा प्रकल्पांची सुरक्षा आणि अशा गुन्ह्यांना आळा घालण्यासाठीच्या व्यवस्थेवरही गंभीर प्रश्न उपस्थित केले आहेत. चोरी करणारा गुन्हेगार असतोच; पण चोरीचा माल खरेदी करण्यासाठी बाजारपेठ उपलब्ध असेल, तर गुन्हेगारीला आर्थिक इंधन मिळत राहते. म्हणूनच या प्रकरणाकडे केवळ काही आरोपींना अटक आणि मुद्देमाल जप्त करण्यापुरते पाहून चालणार नाही. चोरीची साखळी नेमकी कुठून सुरू होते, चोरीचे साहित्य कोणत्या मार्गाने बाजारात पोहोचते आणि त्यातून मिळणाऱ्या पैशांचा प्रवाह कुठपर्यंत जातो, याचा सखोल तपास होणे आवश्यक आहे. सौरऊर्जा प्रकल्पांमधील तांब्याच्या केबलची चोरी ही केवळ मालमत्तेविरुद्धची गुन्हेगारी घटना नाही. अशा साहित्याची चोरी झाल्यास प्रकल्पांच्या दुरुस्तीचा खर्च वाढू शकतो, कामकाजात व्यत्यय येऊ शकतो आणि सुरक्षा व्यवस्थेतील त्रुटी उघड होऊ शकतात. तांबे हा पुनर्विक्रीच्या बाजारात आर्थिक मूल्य असलेला धातू असल्यामुळे त्याच्या चोरीमागे केवळ चोरी करण्याची संधीच नव्हे, तर चोरीचा माल विकून पैसे मिळविण्याची शक्यताही महत्त्वाची असते. जालना जिल्ह्यातील या प्रकरणात चोरीचे तांबे खरेदी केल्याच्या आरोपावरून तिघांना ताब्यात घेण्यात आल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे. त्यामुळे तपासाचा केंद्रबिंदू केवळ चोरी करणाऱ्या व्यक्तींपुरता मर्यादित राहता कामा नये. संबंधित माल कोणाकडून घेतला, त्याची किंमत कशी ठरवली, व्यवहारांची नोंद होती का, मालाच्या मूळ स्रोताबाबत विचारणा झाली होती का आणि अशा व्यवहारांची पुनरावृत्ती झाली होती का, या प्रश्नांची उत्तरे शोधणे आवश्यक आहे. मात्र, येथे एक बाब स्पष्ट ठेवली पाहिजे. चोरीचा माल खरेदी केल्याचा आरोप असणे आणि न्यायालयात दोष सिद्ध होणे या वेगळ्या बाबी आहेत. त्यामुळे तपास पूर्ण होण्यापूर्वी कोणालाही दोषी ठरविणे योग्य नाही. पोलिसांनी पुरावे, व्यवहारांच्या नोंदी आणि संबंधित व्यक्तींच्या भूमिकेची कायदेशीर चौकशी करणे महत्त्वाचे आहे. या कारवाईत जाळून तांबे वेगळे केलेल्या केबलमधून ५३७ किलो तांबे जप्त केल्याचे पोलिसांनी सांगितले आहे. एवढ्या मोठ्या प्रमाणातील तांबे समोर आल्यानंतर सौरऊर्जा प्रकल्पांमधील साहित्याच्या सुरक्षेचा प्रश्न अधिक गंभीर बनतो. प्रकल्पांमध्ये सीसीटीव्ही यंत्रणा, सुरक्षा रक्षक, रात्रीची गस्त, प्रवेश-निर्गमन नोंदी आणि महत्त्वाच्या साहित्याचा नियमित साठा तपासण्याची व्यवस्था कितपत प्रभावी आहे, याचा आढावा घेण्याची गरज आहे. एखाद्या प्रकल्पात चोरी झाल्यानंतर तक्रार दाखल होते आणि तपास सुरू होतो; परंतु चोरी होण्यापूर्वीच ती रोखण्यासाठी कोणत्या उपाययोजना केल्या जातात, हा अधिक महत्त्वाचा प्रश्न आहे. जिल्ह्यातील विविध प्रकल्पांमधून अशा प्रकारच्या चोऱ्या होत असतील, तर संबंधित प्रकल्प व्यवस्थापनांनी परस्पर समन्वय साधून संशयास्पद हालचालींची माहिती तातडीने पोलिसांना देणे आवश्यक आहे. संवेदनशील ठिकाणांची सुरक्षा तपासणी, साहित्याच्या साठ्याचे नियमित लेखापरीक्षण आणि चोरी आढळल्यास तातडीने पुरावे सुरक्षित ठेवणे, या उपाययोजनांना प्राधान्य मिळाले पाहिजे. सौरऊर्जा हा ऊर्जा निर्मितीचा महत्त्वाचा पर्याय आहे. या क्षेत्रात उभारण्यात आलेल्या प्रकल्पांमधील साहित्य वारंवार चोरीला जात असेल, तर त्याचा परिणाम आर्थिक नुकसान आणि देखभाल खर्चापुरता मर्यादित राहत नाही. ऊर्जा पायाभूत सुविधांच्या सुरक्षिततेबाबतही प्रश्न निर्माण होतात. तांब्याच्या चोरीला आळा घालण्यासाठी केवळ सौरऊर्जा प्रकल्पांची सुरक्षा वाढविणे पुरेसे नाही. चोरीचा माल सहज विकता येत असेल, तर गुन्हेगारांना पुन्हा चोरी करण्याचे आर्थिक प्रोत्साहन मिळू शकते. म्हणूनच भंगार खरेदी-विक्रीच्या व्यवहारांमध्ये पारदर्शकता आणि कायद्याचे पालन सुनिश्चित करणे आवश्यक आहे. भंगार व्यावसायिकांनी मालाचा स्रोत, विक्रेत्याची ओळख आणि व्यवहाराच्या नोंदी याबाबत लागू असलेल्या नियमांचे पालन केले पाहिजे. संशयास्पद स्वरूपातील केबल, औद्योगिक साहित्य किंवा मोठ्या प्रमाणातील तांबे विक्रीस आल्यास त्याबाबत योग्य पडताळणी करणे आवश्यक आहे. पोलिसांनीही कायद्याच्या चौकटीत राहून संबंधित व्यवहारांची तपासणी करावी आणि चोरीच्या मालाची खरेदी-विक्री सिद्ध करणारे पुरावे गोळा करावेत. प्रश्न संपूर्ण भंगार व्यवसायाकडे संशयाने पाहण्याचा नाही. प्रामाणिकपणे व्यवसाय करणाऱ्या व्यापाऱ्यांना त्रास न देता चोरीच्या मालाचा बाजार रोखण्याचा आहे. त्यासाठी नियमांची प्रभावी अंमलबजावणी, नोंदींची पडताळणी आणि गुन्हेगारी साखळीतील प्रत्येक दुव्याचा पुराव्याधारित तपास आवश्यक आहे. चोरी करणाऱ्याला पकडणे महत्त्वाचे; पण चोरीचा माल विकण्याचा मार्ग बंद करणे त्याहून अधिक निर्णायक ठरू शकते. स्थानिक गुन्हे शाखेच्या कारवाईत परतूर, मंठा, घनसावंगी आणि अंबड तालुक्यांतील विविध सौरऊर्जा प्रकल्पांशी संबंधित आठ चोरीचे गुन्हे उघड झाल्याचे पोलिसांनी सांगितले आहे. यावरून या प्रकरणाचा तपास अनेक ठिकाणांशी संबंधित असल्याचे दिसते. त्यामुळे प्रत्येक गुन्ह्यातील चोरीचे साहित्य, आरोपींची कथित भूमिका, घटनांची पद्धत आणि मालाच्या विक्रीचे मार्ग यांचा स्वतंत्रपणे तसेच एकत्रितपणे अभ्यास होणे आवश्यक आहे.

या गुन्ह्यांमध्ये आणखी कोणाचा सहभाग आहे का, चोरीच्या मालाची वाहतूक करण्यासाठी अन्य व्यक्ती किंवा वाहने वापरली गेली का, तसेच इतर प्रकल्पांमधील नोंद न झालेल्या चोरीच्या घटनांशी याचा संबंध आहे का, याचीही कायदेशीर चौकशी झाली पाहिजे. पोलिसांच्या तपासातून गुन्हे उघड होणे हा एक टप्पा आहे. त्यानंतर पुरावे भक्कम करणे, चोरीच्या मालाची ओळख निश्चित करणे, संबंधित व्यक्तींच्या भूमिकेची पडताळणी करणे आणि न्यायालयात दोष सिद्ध होण्यासाठी आवश्यक प्रक्रिया पूर्ण करणे हेही तितकेच महत्त्वाचे आहे.

# महाराष्ट्र कुस्ती संघटनेच्या जालना जिल्हाप्रमुखपदी पैलवान संजय मिसाळ यांची निवड

## दीनानाथ अण्णा सिंह, विष्णू तात्या जोशीलकर आणि संग्राम कांबळे यांच्या हस्ते नियुक्तिपत्र व सन्मानचिन्ह देऊन गौरव

**जालना । प्रतिनिधी**

महाराष्ट्राच्या कुस्ती परंपरेचा गौरव करणाऱ्या 'महाराष्ट्र कुस्ती महागौरव पुरस्कार सोहळा २०२६' मध्ये पैलवान संजय मिसाळ यांची महाराष्ट्र कुस्ती संघटनेच्या जिल्हाप्रमुखपदी निवड झाल्याबद्दल त्यांचा सन्मान करण्यात आला. हिंदकेसरी पैलवान दीनानाथ अण्णा सिंह, १९८५ सालचे महाराष्ट्र केसरी पैलवान विष्णू तात्या जोशीलकर आणि महाराष्ट्र कुस्ती संघटनेचे प्रमुख संग्राम दादा कांबळे यांच्या हस्ते मिसाळ यांना नियुक्तिपत्र व सन्मानचिन्ह प्रदान करण्यात आले. कुस्ती क्षेत्रातील मान्यवरांच्या उपस्थितीत झालेला हा गौरव त्यांच्या पुढील संघटनात्मक वाटचालीसाठी महत्त्वाचा ठरला. कोल्हापूर या कुस्तीपंढरीत आयोजित करण्यात आलेल्या महाराष्ट्र कुस्ती महागौरव पुरस्कार सोहळ्याला कुस्ती क्षेत्रातील ज्येष्ठ पैलवान, वस्ताद, पदाधिकारी, कुस्तीप्रेमी आणि विविध जिल्ह्यांतील प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते. महाराष्ट्राच्या कुस्ती परंपरेचे जतन करणे, कुस्ती क्षेत्रातील योगदानाचा सन्मान करणे आणि संघटनात्मक कार्याला बळ देणे, या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या या सोहळ्यात संजय मिसाळ यांची जिल्हाप्रमुखपदी निवड झाल्याबद्दल त्यांना नियुक्तिपत्र देऊन गौरविण्यात आले.

हिंदकेसरी दीनानाथ अण्णा सिंह, महाराष्ट्र केसरी विष्णू तात्या जोशीलकर आणि महाराष्ट्र कुस्ती संघटनेचे प्रमुख संग्राम कांबळे यांच्या हस्ते संजय मिसाळ यांना नियुक्तिपत्र आणि सन्मानचिन्ह देण्यात आले. कुस्ती क्षेत्रातील अनुभवी आणि मान्यवर व्यक्तींच्या हस्ते झालेल्या या सत्कारामुळे कार्यक्रमाला विशेष महत्त्व प्राप्त झाले.



कुस्ती क्षेत्रात पैलवान म्हणून कार्य करताना आखाड्यातील मेहनत, शिस्त, सातत्य आणि जिद्द यांना महत्त्व असते. त्याचबरोबर कुस्तीचा प्रसार, नवोदित पैलवानांना प्रोत्साहन, वस्ताद आणि खेळाडू यांच्यात समन्वय तसेच कुस्ती संघटनेचे कार्य तळागाळापर्यंत पोहोचविण्यासाठी संघटनात्मक जबाबदारीही महत्त्वाची असते. जिल्हाप्रमुखपदाच्या माध्यमातून अशा कार्याला चालना देण्याची संधी संजय मिसाळ यांना मिळाली आहे. महाराष्ट्रात कुस्तीला मोठी परंपरा लाभली असून ग्रामीण भागापासून शहरांपर्यंत अनेक आखाड्यांतून पैलवान घडत आहेत. या खेळाची परंपरा टिकविण्यासाठी स्थानिक पातळीवर कुस्तीला प्रोत्साहन देणे, नव्या खेळाडूंना संधी उपलब्ध करून देणे आणि कुस्ती क्षेत्रातील विविध घटकांना एकत्र आणणे आवश्यक आहे. या पार्श्वभूमीवर जिल्हास्तरावरील संघटनात्मक पदांना विशेष महत्त्व प्राप्त होते.

महाराष्ट्र कुस्ती संघटनेच्या जिल्हाप्रमुखपदी निवड झाल्यामुळे संजय मिसाळ यांच्यावर जिल्ह्यातील कुस्ती क्षेत्राशी संबंधित उपक्रमांना संघटनात्मक बळ देण्याची जबाबदारी आली आहे. कुस्तीची परंपरा जपणे, पैलवानांच्या कर्तृत्वाला योग्य व्यासपीठ मिळवून देणे आणि नव्या पिढीमध्ये कुस्तीविषयी आवड निर्माण करण्यासाठी प्रयत्न करणे, अशा कार्याला या नियुक्तीच्या माध्यमातून दिशा मिळू शकते.

महाराष्ट्र कुस्ती महागौरव पुरस्कार सोहळा २०२६ मध्ये पद्मश्री मुरलीकांत पेटकर, हिंदकेसरी दीनानाथ अण्णा सिंह, ऑलिम्पिकवीर पैलवान बंडा पाटील रेठरेकर, ज्येष्ठ छायाचित्रकार बापू मकानदार, महाराष्ट्र केसरी विष्णू तात्या जोशीलकर, महाराष्ट्र केसरी समाधान आप्पा घोडके, उपमहाराष्ट्र केसरी संभाजीराव पाटील, ऑलिम्पिकवीर खाशाबा जाधव यांचे सुपुत्र रणजीत जाधव आणि ज्येष्ठ वस्ताद रंगनाथ कळंत्रकर यांची उपस्थिती लाभली.

महाराष्ट्र कुस्ती संघटनेचे प्रमुख संग्राम कांबळे, राज्य उपाध्यक्ष पैलवान अमोल मदने, मुख्य प्रवक्ते अशोक धोत्रे यांच्यासह राज्य पदाधिकारी, १५ जिल्ह्यांचे जिल्हाप्रमुख, तालुकाप्रमुख, पैलवान, वस्ताद आणि कुस्तीप्रेमींनी या सोहळ्यात सहभाग घेतला. या कार्यक्रमातून कुस्ती क्षेत्रातील ज्येष्ठांच्या योगदानाचा गौरव करण्याबरोबरच संघटनात्मक एकजुटीचा संदेश देण्यात आला.

पैलवान संजय मिसाळ यांच्या जिल्हाप्रमुखपदी झालेल्या निवडीमुळे त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत असून, त्यांच्या पुढील वाटचालीसाठी कुस्ती क्षेत्रातून शुभेच्छा व्यक्त केल्या जात आहेत. कुस्तीचा विकास, पैलवानांचा सन्मान आणि महाराष्ट्राच्या लाल मातीची परंपरा जपण्याच्या उद्देशाने त्यांचे आगामी कार्य महत्त्वाचे ठरणार आहे.

पान १ व ४ वरुन...

### वैंद्यवडगाव शिवारात...

१२ ऑक्टोबर रोजी जालना जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक तेगबिर सिंह संधू आणि अपर पोलीस अधीक्षक विक्रम साळी यांनी अवैध गांजाची लागवड व विक्री करणाऱ्यांविरुद्ध प्रभावी कारवाई करण्याचे निर्देश दिले होते. त्यानुसार जिल्हा पोलिसांकडून अशा प्रकारच्या गैरकृत्यांवर लक्ष ठेवण्यात येत होते.

दरम्यान, वैद्यवडगाव शिवारातील एका शेतात गांजाची झाडे लावून उत्पादन घेतले जात असल्याची खात्रीशीर माहिती गुप्त बातमीदारामार्फत पोलिसांना मिळाली. या माहितीच्या आधारे सेवली पोलीस ठाण्याचे पथक आणि जालना येथील अंमली पदार्थविरोधी पथकाने संबंधित शेतात संयुक्तरीत्या छापा टाकला.

**जनावरांच्या चाऱ्याच्या गवतामध्ये गांजाची झाडे**

पोलिसांनी शेताची पाहणी केली असता, जनावरांना खाऊ घालण्यासाठी लावलेल्या गजरा गवताच्या शेतामध्ये गांजाची झाडे आढळून आली. या कारवाईत एकूण ४१ किलो वजनाची ओली गांजाची झाडे जप्त करण्यात आली. जप्त केलेल्या मुद्देमालाची किंमत १६ लाख ४० हजार रुपये असल्याचे पोलिसांनी नमूद केले आहे.

शेतमालक दिनकर दत्ताराव वैद्य याला ताब्यात घेऊन त्याच्याकडे चौकशी करण्यात आली. संबंधित शेत आपल्या मालकीचे असून गांजाची लागवड आपणच केल्याचे त्याने सांगितल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे. या प्रकरणी पुढील कायदेशीर कारवाई सुरू करण्यात आली आहे.

**एनडीपीएस कायद्यान्वये गुन्हा दाखल**

या प्रकरणी सेवली पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर क्रमांक १६६/२०२६ नुसार अंमली पदार्थ आणि मनःप्रभावी पदार्थ अधिनियम, १९८५ च्या कलम २०(ब)()(क) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गांजाची लागवड नेमक्या कोणत्या उद्देशाने करण्यात आली होती, तसेच या प्रकरणात इतर कोणाचा सहभाग आहे का, याबाबत तपासातून अधिक माहिती समोर येण्याची शक्यता आहे.

**वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली कारवाई**

ही कारवाई पोलीस अधीक्षक तेगबिर सिंह संधू, अपर पोलीस अधीक्षक विक्रम साळी आणि परतूरचे उपविभागीय पोलीस अधिकारी रामेश्वर रेंगे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. सेवली पोलीस ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षक आनंदसिंग साबळे, अंमली पदार्थविरोधी पथकाचे सहायक पोलीस निरीक्षक सचिन इंगवाड, सेवली पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक एस. एम. शेख, तसेच अंमली पदार्थविरोधी पथक आणि सेवली पोलीस ठाण्यातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी या संयुक्त कारवाईत सहभाग घेतला.

अवैध गांजाची लागवड उघडकीस आणून मोठ्या किमतीचा मुद्देमाल जप्त केल्याने जिल्ह्यातील अंमली पदार्थविरोधी कारवायांना महत्त्व प्राप्त झाले आहे. या प्रकरणाचा पुढील तपास सेवली पोलीस करीत आहेत.

### जालन्यात'विकसित भारत...

आहे. या २५ वर्षाच्या प्रवासाचे सर्व श्रेय ते देशातील करोडो कार्यकर्ते, लाखो स्वयंसेवक व पदाधिकारी, कार्यकर्त्यांना देतात. देशाच्या प्रमुख पदावर काम करून सुद्धा स्वतःला पंतप्रधान न संबोधता प्रधान सेवक म्हणतात व सेवा हाच धर्म, विकसित भारत हेच ध्येय अशा या दूरदृष्टी नेत्याच्या काळात भारत विश्वगुरु बनल्याशिवाय राहणार नाही, याची मला पूर्ण खात्री आहे. असे बोलताना त्यांनी सांगितले व सर्वांना संकल्प शपथ देण्यात आली. या वेळी बोलताना भाजपा जालना महानगर जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे यांनी पंतप्रधान मोदीजींच्या २५ वर्षांच्या सेवाप्रवासाचा गौरवपूर्ण उल्लेख केला. ते म्हणाले, ''जनतेचा विश्वास हीच प्रेरणाशक्ती मानून आदरणीय मोदीजींनी आपल्या राजकीय जीवनाची सुरुवात केली. गेल्या २५ वर्षांत त्यांनी एकही दिवस विश्रांती न घेता देशाच्या विकासासाठी, गरीब, शेतकरी, महिला, युवक आणि वंचित घटकांच्या कल्याणासाठी अहोरात्र परिश्रम घेतले. त्यांचा हा प्रवास आपल्या सर्व कार्यकर्त्यांसाठी आदर्श आणि प्रेरणादायी आहे. असे त्यांनी सांगितले.

यावेळी ओबीसी मोर्चा जिल्हाध्यक्ष सतीश केळकर, महिला मोर्चा मंडळ अध्यक्षा सुषमाताई खरात, रश्मी टेकवाणी, जिल्हा उपाध्यक्ष राजेंद्र भोसले, नगरसेवक महावीर ढक्का, रमेश गौरक्षक, सुशीलाताई दानवे, सखुबाई पणबिसरे, श्रद्धा साळवे, शोभाबाई नारीयलवाले, कल्याण भदनेकर, ज्योती सले, पदमा मानधनी, मजहर सय्यद, पूनम स्वामी, रिमा खरात (काळे), जगदीश भरतिया, विनोद रत्नपारखे, वीरेंद्र धोका, आनंद झारकंडे, सोपान पेंढारकर, शीतलप्रसाद पांडे, प्रभुलाल गोमतीवाले, सिध्देश्वर हाजबे, अशोक आडेकर, जीवन सले, दुर्गेश कुरील, सोमेश काबलिये, रोहित खोडवे, शाम उगले, संतोष खंडेलवाल, रोहित भूरेवाल, आकाश देशमाने, संजय भगत, विनोद शिनगारे, मनोज इंगळे, कपिल अनभोरे, शिवराज नारीयलवाले, गोविंद भताने, राज स्वामी, पांडुरंग आहेरकर, शाम जाधव, बापू साळवे, गौरव गोधेकर, राजेश देसार, सिद्धेश्वर गोरे, गोवर्धन उबाळे, कैलास सोळुंके, बजरंग राजपूत, राहुल यादव, यश खरात, राजाराम जाधव, कृष्णा गायके, गुलाब पणबिसरे आदींसह मोठ्या संख्येने पदाधिकारी व कार्यकर्त्यांची उपस्थिती होती.सेवा संकल्प सभेनंतर सेवा ज्योती यात्रा स्वातंत्र्यवीर सावरकर चौक येथून जनार्धन मा मा चौक पर्यंत काढण्यात आली. सेवा ज्योतीच्या माध्यमातून राष्ट्रसेवेची ही अखंड ज्योत पुढे नेण्याचा आणि विकसित भारताच्या स्वप्नपूर्तीसाठी योगदान देण्याचा निर्धार यावेळी केला.

### जालना जिल्हा...

दिला. यावेळी जिल्हा ग्रंथालय अधिकारी श्री. साबळे यांनी प्रास्ताविक करतांना, जिल्ह्यातील जास्तीत जास्त विद्यार्थी व नागरिकांनी ग्रंथालयाचा आणि या प्रदर्शनाचा लाभ घ्यावा, असे आवाहन केले. या प्रदर्शनात मराठी भाषा, साहित्य, इतिहास आणि संस्कृतीशी संबंधित अनेक दुर्मिळ व दर्जेदार पुस्तके वाचकांसाठी उपलब्ध करून देण्यात आली आहेत.

कार्यक्रमाचे सूत्रसंचलन आणि आभारप्रदर्शन ग्रंथालयाचे तांत्रिक सहाय्यक सतीश जाधव यांनी केले. या सोहळ्यास परिसरातील विद्यार्थी, वाचक आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### ०५ औरंगाबाद विभाग...

आली. तसेच या प्रक्रियेचा व्हिडिओ क्लिपही दाखविण्यात आल्या. निवडणुकीसंदर्भातील विविध विवरणपत्रे अचूकपणे भरण्याबाबतही उपस्थितांना प्रशिक्षण देण्यात आले.

०५-औरंगाबाद विभाग पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीत मतदान करण्यासाठी पात्र असलेल्या मतदारांना संबंधित मतदार यादीत आपले नाव ://./८६८ या लिंकवर तपासता येणार आहे. निवडणुकीसाठी नियुक्त सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांनी त्यांना सोपविण्यात आलेली कामे जबाबदारीने आणि दक्षतेने पूर्ण करावीत. तसेच तालुकास्तरावर आयोजित करण्यात येणारे दुसरे व तिसरे प्रशिक्षण गांभीर्याने पूर्ण करून मतदान प्रक्रियेदरम्यान कोणतीही अडचण उद्भवणार नाही, याची दक्षता घ्यावी, असे आवाहन उपजिल्हा निवडणूक अधिकारी, जालना यांनी केले. यानंतर पहिले जिल्हास्तरीय प्रशिक्षण पूर्ण झाल्याचे जाहीर करण्यात आले. या प्रशिक्षणास आयुक्त, जालना शहर महानगरपालिका; पोलीस अधीक्षक, जालना; मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जालना; सर्व उपविभागीय अधिकारी, नोडल अधिकारी, तहसीलदार, निवडणूक नायब तहसीलदार, क्षेत्रीय अधिकारी, मतदान केंद्राध्यक्ष आणि मायक्रो ऑब्झर्व्हर उपस्थित होते.

### तुळजाभवानी मंदिरात...

सुरेश रत्नपारखे, पुजारी रमेश शिंदे, गोकुळ स्वामी, संतोष गायकवाड, सदाशिव वाघमारे, राजू इंगळे, बाबासाहेब बनसोडे, विशाल आराधी तसेच आराधी मंडळाच्या आश्रुबाई गंगावणे, मीनाबाई यांच्यासह अनेक महिला उपस्थित होत्या. यावेळी उपस्थितांनी शेतकऱ्यांना संकटातून दिलासा मिळावा, राज्यात चांगला पाऊस पडून शेतीला सुगीचे दिवस यावेत, बेरोजगार युवकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध व्हाव्यात आणि सर्वांच्या जीवनात सुख-समृद्धी नांदावी, अशी प्रार्थना तुळजाभवानी मातेकडे केली.

### राज्यस्तरीय सिनीयर...

खेळाडुंनी लाभ घ्यावा असे आवाहन जिल्हा संघटनेचे अध्यक्ष जयंतराजे भोसले, देवगिरी विद्या प्रतिष्ठाणचे अध्यक्ष बबन दादा सोरटी, जि.ई.एस. एज्युकेशनल कॅम्पसचे अध्यक्ष ज्ञानेश्वर पा. पुंगळे, नगरसेवक अश्विन अंबेकर, जिल्हा क्रीडा अधिकारी नरेंद्र पवार, क्रीडा अधिकारी श्रीमती लता लोंढे, श्रीमती आरती चिल्लारे, राज्य क्रीडा मार्गदर्शक सिद्धार्थ कदम, आशीष जोगदंड, माजी नगरसेवक बाला परदेसी, ज्ञानेश्वर ढोबळे, प्रा. भुजंग डावकर, प्रा. चंद्रकांत लाटेकर, प्रा. गायत्री सोरटी, सुभाष पारे, श्रीमती सुनीता गवई, राजेश शेवाळे, गणेश भि. लांडगे, जालना जिल्हा टेनिक्काईट असोसिएशन जालना व जालना जिल्हा ऑलंम्पीक असोसिएशन यांच्यावतीने करण्यात आले आहे.

### जिल्हाधिकाऱ्यांच्या पुढाकारातून...

नागरिकांची व शेतकऱ्यांची मोठी गैरसोय झाली होती.

या प्रकरणाची जिल्हाधिकारी यांनी गांभीर्याने दखल घेत एक विशेष समिती नेमण्याचे आदेश दिले. या समितीने घटनास्थळी भेट देऊन सर्व संबंधित घटकांशी संवाद साधत सकारात्मक मध्यस्थी केली. समितीच्या यशस्वी मध्यस्थीमुळे व प्रशासकीय कारवाईमुळे बंद असलेला हा रस्ता पुन्हा सुरळीत व पूर्णपणे खुला करण्यात आला.

### जालना जिल्ह्यातील...

नोंदणी करून रुग्णांना अतिरिक्त पोषण देण्याचा उपक्रम सुरू आहे. रोटरी क्लब आणि एस.आर.जी. पित्ती स्टील यांच्या सहकार्यामुळे रुग्णांना औषधांसोबतच उच्च प्रथिने असलेला पोषण आहार मिळत आहे, ज्याचा त्यांच्या आरोग्यावर अतिशय सकारात्मक परिणाम होईल.''

जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी या सामाजिक उपक्रमाचे कौतुक करत एस.आर.जी. पित्ती स्टील व रोटरी क्लब ऑफ जालना यांना प्रशस्तीपत्र देऊन गौरवले, तसेच भविष्यातही असेच योगदान देण्याचे आवाहन केले.

यावेळी डॉ. रमेश काकड, डॉ. परशुराम नागदरवाड यांच्यासह राष्ट्रीय क्षयरोग निर्मूलन कार्यक्रमाचे सर्व अधिकारी व कर्मचारी यांच्यासह जिल्ह्यातील क्षयरुग्ण व त्यांचे नातेवाईकांची मोठ्या संख्येने उपस्थित होती.

### माहोरा येथील...

दि.२९ सप्टेंबर रोजी माझ्या स्वप्नातील भारत आणि विकसित भारत २०४७ या विषयांवर वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. दि.३० सप्टेंबर रोजी वर्गाच्या खोल्या, कार्यालय व शालेय परिसराची स्वच्छता करण्यात आली आणि विद्यार्थ्यांना श्रमदानाचे महत्त्व पटवून देण्यात आले. दि. १ आक्टोबर रोजी आर्थिकदृष्ट्या किंवा सामाजिकदृष्ट्या वंचित विद्यार्थ्यांना शालेय साहित्य, पुस्तके, वह्या व पेन पॅडचे वाटप करण्यात आले. आणि दि. २ आक्टोबर रोजी महात्मा गांधी जयंती साजरी करून सेवा संकल्प सप्ताहाची सांगता करण्यात आली. या प्रसंगी शासनाच्या विविध कल्याणकारी योजनांची माहिती विद्यार्थी व पालकांना देऊन जनजागृती करण्यात आली.

शाळेचे मुख्याध्यापक आणि शिक्षक वृंदाच्या मार्गदर्शनाखाली सर्व उपक्रम उत्साहात पार पडले.

# करवीर निवासिनी.. कोल्हापूरची श्री. अंबाबाई..!!

कोल्हापूरच्या अंबाबाई (महालक्ष्मी) मंदिराचा समावेश शक्तीपिठांमध्ये केला जातो. संपूर्ण भारत तसेच नेपाळ आणि बांग्लादेशचा काही भाग यांमध्ये मिळून एकूण ५१ शक्तीपिठे सांगितली जातात. हे सर्व शक्तीपिठ हे आदि शक्तीच्या विविध रूपांना समर्पित आहेत. शक्तीपिठांच्या निर्मितीबद्दल एक कथा विविध पुराणांमध्ये समाविष्ट आहे. शक्तीने जेव्हा सती रूपामध्ये अवतार घेऊन महादेवांसोबत विवाह केला होता, त्यावेळची ही कथा आहे. सतीचे वडील दक्ष यांनी एक यज्ञ आयोजित केलेला होता, जेथे महादेवांना सोडून इतर सर्व जावयांना दक्षाने आमंत्रित केले होते. दक्षाचे सर्व जावई हे विविध देवतागण होते. सतीला वाटले की महादेवांना आमंत्रित करणे दक्ष चुकून विसरले असावे. त्यामुळे सती न बोलावणे येताही तेथे उपस्थित झाली. यावेळी दक्ष राजाने महादेवांच्या राहणीमान आणि वेशभुषेवरून सतीला हिनवले. पतीचा अपमान सहन न झाल्याने रागाच्या भरात तिने यज्ञकुंडात उडी मारून आत्मदाह करून घेतला. सतीच्या अशा प्रकारे निघून जाण्याम ळे महादेवांना खूप रग आला. विरभद्र रूपात त्यांनी दक्ष राजाचा यज्ञ उद्ध्वस्त केला आणि दक्ष राजास मारून टाकले. मात्र त्यांचा राग येथेच शांत झाला नाही. राग आणि शोकाच्या भरात त्यांनी सतीचे अर्धवट जळालेले मृतदेह आपल्या खांद्यावर घेतले आणि संहार तांडव हे नृत्य आरंभ केले.

संहार तांडवामुळे संपूर्ण ब्रम्हांड नष्ट होईल अशी भिती सर्व देवतांना वाटू लागली. महादेवांना शोकस्थितीतून बाहेर काढण्यासाठी




विष्णूंनी आपल्या सुदर्शन चक्राने सतीच्या शरिराचे तुकडे केले. सतीच्या शरीराचे हे तुकडे पृथ्वीवर ज्या ज्या ठिकणी पडले, तेथे एक शक्तीपिठ निर्माण झाले. महाराष्ट्रामध्ये कोल्हापूर सोबतच तुळजापूर (जि धाराशिव) आणि माहू (जि नांदेड) अशी आणखी दोन शक्तीपिठे आहेत. तर वणी (जि नाशिक) येथील सप्तशृंगी देवीला अर्ध शक्तीपिठ मानण्यात येते. कोल्हापूर येथे सतीचा डोळा पडला होता असे मानले जाते. यामुळे आपोआपच या जागेचा संबंध सती (शक्तीचे एक रूप) यांच्यासोबत जोडला गेलेला आहे. तमोगुणयुक्त रूपात महाकाली तर सत्वगुणायुक्त रूपात महासरस्वती झाली. अशी कथा आहे. पुढे तिने लक्ष्मी, ब्रह्मदेव यांना जन्म दिला. म हाकालीने शंकर, त्रयी, विद्या यांना तर महासरस्वतीने विष्णू, गौरी यांना जन्म दिला. अशाप्रकारे विश्वनिर्मितीला प्रारंभझाला. विराट स्वरूपात प्रगट झालेली काश्मीर, कांची, कामाख्या ही देवीची तीन पीठे होत. अंबाबाई, महालक्ष्मीच्या देवालयाबाबत संशोधन परिपूर्ण नाही. शिलाहार देवीचे भक्त असल्याने देवीचा वरप्रसाद त्यांना मिळाल्याचे संदर्भ काही ठिकाणी आढळतात. मंदिरातील रचना चक्रराज आढळतात. सर्वतोभद्रमंडल प्रमाणे आहे. महालक्ष्मीची मूर्ती दगडी चौथऱ्यावर असून सुंदर नक्षीकाम केलेला घाटी दरवाजा, गरुड मंडप. पाच शिखरांसह गर्भगृहमंडप, मध्यमंडप, गरुडमंडप असे तीन मंडप आहेत. भगवान शंकर आणि परमदेवीमध्ये स्थानाच्या महानतेवरून झालेला वाद भगवान विष्णूंनी संपवला. विश्वनिर्मितीनंतर भगवान विष्णूने काशी, करवीरची निर्मिती केली असे जाणकार सांगतात. लक्ष्मीने कोल्हासूर राक्षसाचा वध केल्यानंतर नगराचे नाव त्याच्या नावावर ठेवण्याची त्याची इच्छा असल्याने हे शहर कोल्हापूर म्हणून ओळखले जाऊ लागले. शैवांच्या मते अंबाबाई पार्वतीचे रूप आहे तर वैष्णव तिला महालक्ष्मीचे रूप मानतात. करवीरक्षेत्र श्रीमहालक्ष्मीचं आवडतं ठिकाण असल्याने तिथं नतमस्तक होणाऱ्या भक्ताला भक्तिचा पाझर फ टतो. खण नारळाची ओटी, हिरवा चुडा, तेजोमय प्रभावळी जरतार शोभे पिवळ्या रंगाची. स्त्रीशक्तीचा जागर भोंडला, भुलाई चाले, बाया जमती हळदीकुंकवासी. महालक्ष्मी, अंबा म ातेचा उदो उदो करत दिवट्या पेटतात, अंबा आली गोंधळाला, चला वाजवू संबळाला म्हणतं, राती जागविल्या जातात. अशा महाकाली महालक्ष्मी, महासरस्वती रूपातल्या करवीर निवासिनी अंबाबाई, श्री महालक्ष्मीला आमचा दंडवत...!! श्री.अंबाबाईच्या नावाने चांगभलं...!!



**ह.भ.प. शिवाजी विठ्ठल चौगुले.**
**कागल-कोल्हापूर**
**९८६७७३२५०४.**

# रेल्वे मजुरांना मदतीचे वाटप



**जालना – प्रतिनिधी**

जालना शहरात रेल्वे मार्गाच्या कामासाठी आलेल्या परराज्यातील आदिवासी भागातून आलेल्या मजुरांना जालना शहरातील गुड मॉर्निंग ग्रुप व केपीएमसी ग्रुपच्या वतीने पांघरूण तसेच मुलांना कपडे व मिठाईचे वाटप करण्यात आले. जालना शहरातील रेल्वे गेट क्रमांक येथे मध्य प्रदेश, गुजरात व महाराष्ट्र राज्यातील सीमेवरील आदिवासी मजूर मंडळी रेल्वे मार्गाच्या कामासाठी आली आहेत. या मजुरांना जालना शहरातील गुड मॉर्निंग ग्रुप व के पी एम सी ग्रुप तर्फे प्रत्येक कुटुंबाला अंथरण्यासाठी गालीचा, साडी, मुलासाठी कपडे, व मिठाईचा बॉक्स,बिस्कीट, व सर्वांना तयार पोह्यांचा नाष्टा,चहाचे वाटप करण्यात आले.या उपक्रमासाठी सुधीर गायकवाड, संतोष गायकवाड,प्रताप देशमुख, गोपाळ पारे, सचिन जैवळ ,शाम खरात,किशोर खैरे, वझरकर, निर्वे, सुरेश तौर, पत्रकार अंकुशराव देशमुख,दिलीप ब्राम्हणे,माने , राठोड, घोडके, कातरडे, रेघुटे,प्रकाश सराफ,नंदकुमार घुले आदींनी सहकार्य केले.

# मुख्यमंत्री फडणवीस यांच्या पुढाकारातून तयार झालेल्या 'वारी'वरील माहितीपटाचा जागतिक स्तरावर सन्मान




माहिती व जनसंपर्क विभागाद्वारे निर्मित 'पंढरपूर वारी - इन द फूटस्टेप्स ऑफ द सेंट्स' माहितीपटाला आंतरराष्ट्रीय बहुमान

मुंबई, दि. १० : पंढरपूर आषाढी वारीचा आध्यात्मिक आणि सांस्कृतिक वारसा जागतिक प्रेक्षकांपर्यंत पोहोचविण्यासाठी माहिती व जनसंपर्क विभागामार्फत निर्मिती करण्यात आलेल्या 'पंढरपूर वारी इन द फूटस्टेप्स ऑफ द सेंट्स' या माहितीपटाची प्रतिष्ठित 'एशियन अकॅडमी क्रिएटिव्ह अवॉर्ड्स २०२६'मध्ये 'सर्वोत्कृष्ट ब्रँडेड कार्यक्रम' श्रेणीत भारताचा राष्ट्रीय विजेता म्हणून निवड झाली आहे. महाराष्ट्राच्या संस्कृतीचे हे जागतिक पटलावर उमटलेले प्रतिबिंबच आहे.

महाराष्ट्राचे वैभव असलेली पंढरपूर वारीची भक्तिमार्गातली समृद्ध परंपरा जगासमोर आणण्याच्या उद्देशाने या माहितीपटाची निर्मिती करण्यात आली. माहिती व जनसंपर्क विभाग आणि वॉर्नर ब्रदर्स डिस्कवरी यांच्यामार्फत निर्मित या माहितीपटाचे डिस्कवरीच्या जगभरातील विविध वाहिन्यांवरुन प्रसारण करण्यात आले आहे.

महाराष्ट्राच्या संतपरंपरेचा, वारकरी संप्रदायाचा आणि शेकडो वर्षांची परंपरा असलेल्या पंढरपूर वारीचा जागतिक प्रेक्षकांना परिचय करून देण्यासाठी २२ मिनिटांचा इंग्रजी भाषेतील माहितीपट तयार करण्यात आला आहे.

संत ज्ञानेश्वर आणि संत तुकाराम महाराजांनी दिलेला भक्ती, समता, मानवता आणि बंधुभावाचा संदेश भाषेच्या मर्यादा ओलांडून आंतरराष्ट्रीय व्यासपीठावर पोहोचविण्याच्या दृष्टीने हा माहितीपट महत्त्वपूर्ण ठरला आहे.

वारीच्या गौरवशाली परंपरेचा आंतरराष्ट्रीय स्तरावर बहुमान

**मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस**

यासंदर्भात प्रतिक्रिया देताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, पंढरपूर वारी ही भक्तीमार्गातील अतिशय प्राचीन परंपरा असून ती जात, धर्म, गरीब-श्रीमंत असा कोणताही भेद न करता सर्वांना विठुरायाच्या रंगात रंगवून एकत्र आणते. ही महान परंपरा, तिचे उद्दिष्ट आणि विचार जगभरात पोहोचवण्यासाठी माहिती व जनसंपर्क विभागामार्फत 'पंढरपूर वारी इन द फूटस्टेप्स ऑफ द सेंट्स' ही सुंदर डॉक्युमेंट्री तयार करून रिलीज करण्यात आली आहे.

या डॉक्युमेंट्रीला 'एशियन अकॅडमी क्रिएटिव्ह अवॉर्ड्स २०२६ मध्ये भारत देशासाठीचा 'सर्वोत्कृष्ट ब्रँडेड कार्यक्रम' हा राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त झाला आहे. यासाठी माहिती व जनसंपर्क विभाग आणि वॉर्नर ब्रदर्स डिस्कव्हरी यांचे मी अभिनंदन करतो.

वारीची गौरवशाली परंपरा जगासमोर मांडणारी माहितीपट सर्वांनी पाहावा, असे आवाहन मुख्यमंत्र्यांनी केले.

वारीची सांस्कृतिक परंपरा आंतरराष्ट्रीय स्तरावर अधोरेखित प्रधान सचिव ब्रिजेश सिंह माहिती व जनसंपर्क विभागाचे प्रधान सचिव व महासंचालक ब्रिजेश सिंह म्हणाले की, आशिया-पॅसिफिक क्षेत्रातील विविध देशांमधून सादर झालेल्या दर्जेदार निर्मितींमधून या माहितीपटाची भारताचा राष्ट्रीय विजेता म्हणून निवड झाली. या बहुमानामुळे महाराष्ट्राची भक्तीपरंपरा, संतसाहित्य, सामाजिक समतेचा संदेश आणि वारीची वैशिष्ट्यपूर्ण सांस्कृतिक परंपरा आंतरराष्ट्रीय स्तरावर अधोरेखित झाली आहे.

# डॉ. दशरथ भोसले : वयाच्या ७९ व्या वर्षीही ज्ञानसाधना आणि साहित्यनिर्मितीचा ध्यास

**पुणे - प्रतिनिधी**

प्रशासकीय अनुभव, शिक्षणक्षेत्रातील योगदान, सामाजिक बांधिलकी आणि साहित्यनिर्मिती यांचा सुंदर संगम असलेले डॉ. दशरथ भोसले हे बहुआयामी व्यक्तिमत्त्व आहे. त्यांच्या ७९ व्या वाढदिवसानिमित्त त्यांच्या कार्याचा आढावा घेताना विशेषत्वाने जाणवते ती त्यांची ज्ञानसाधनेची जिद्द, समाजासाठी योगदान देण्याची वृत्ती आणि साहित्याविषयीची आस्था.



डॉ. भोसले यांनी कोकण कृषी विद्यापीठ, दापोली येथे सहायक कुलसचिव, उपकुलसचिव आणि नियंत्रक अशा विविध प्रशासकीय पदांवर काम केले. प्रशासकीय क्षेत्रातील प्रदीर्घ अनुभवानंतरही त्यांचे शिक्षणक्षेत्राशी असलेले नाते कायम आहे. ते आर. व्ही. बेलोसे एज्युकेशन फाउंडेशनमध्ये कार्यवाह म्हणून कार्यरत आहेत. विविध शैक्षणिक आणि सामाजिक संस्थांना त्यांनी आर्थिक तसेच बौद्धिक स्वरूपाचे साहाय्य केले आहे. आर्थिक मदतीबरोबरच अनुभव, मार्गदर्शन आणि विचारांची देवाणघेवाण यांनाही महत्त्व असते. या दोन्ही प्रकारे योगदान देण्याची त्यांची वृत्ती विशेष उल्लेखनीय आहे.वयाच्या पंचाहत्तरीत पीएच.डी. डॉ. भोसले यांच्या जीवनातील प्रेरणादायी बाब म्हणजे वयाच्या पंचाहत्तरीत पीएच.डी. पदवी संपादन करण्याची त्यांची जिद्द. त्यांच्या संशोधनाचा विषय होता, 'विस्थापितांच्या जीवनावरील कादंबऱ्यांचा अभ्यास'. या वयातही अभ्यास, चिंतन आणि संशोधनासाठी त्यांनी घेतलेले परिश्रम शिक्षणाला वयाची मर्यादा नसते, हा विचार अधोरेखित करतात.

त्यांचे संशोधन मार्गदर्शक डॉ. जयद्रथ जाधव यांच्या सहकार्याने त्यांनी 'विस्थापितांच्या जीवनावरील मराठी कादंबऱ्यांचे स्वरूप' आणि 'मराठीतील विस्थापित कादंबऱ्यांचे अंतरंग' ही दोन पुस्तके लिहिली. नुकतीच प्रकाशित झालेली ही पुस्तके त्यांच्या संशोधनकार्याची पुढील पायरी आहेत.

विनोदापासून भावविश्वापर्यंत डॉ. भोसले यांनी 'म्हातारपणाचं टॉनिक' आणि 'काकांना हार्ट अटॅक येतो' ही दोन विनोदी पुस्तके लिहिली आहेत. मानवी स्वभावातील गंमतीजमती आणि जीवनातील विसंगती यांना विनोदाची जोड देणारे हे लेखन त्यांच्या साहित्यिक अभिरुचीचा वेगळा पैलू दाखवते.

पत्नी मंगला ताई यांच्या निधनानंतर त्यांनी त्यांच्यावर आणि कुटुंबीयांवर आधारित 'मांगल्याचा रथ' हे पुस्तक लिहिले. या लेखनातून सहजीवनातील आठवणी आणि कौटुंबिक भावविश्व जपण्याचा संवेदनशील प्रयत्न दिसून येतो. विनोदी लेखनापासून कौटुंबिक आठवणींपर्यंत आणि गंभीर साहित्यसंशोधनापर्यंतचा त्यांचा प्रवास त्यांच्या लेखनातील वैविध्य अधोरेखित करतो.

डॉ. दशरथ भोसले यांचे प्रशासकीय योगदान, ज्ञानसाधना, सामाजिक संस्थांना केलेले साहाय्य आणि साहित्यनिर्मिती कौतुकास्पद आहे. त्यांच्या ७९ व्या वाढदिवसानिमित्त त्यांना मनःपूर्वक शुभेच्छा! त्यांना उत्तम आरोग्य, दीर्घायुष्य आणि आनंद लाभो. त्यांची ज्ञानसाधना व साहित्यिक वाटचाल अशीच सुरू राहो आणि त्यांच्या अनुभवाचा लाभ समाजाला मिळत राहो, हीच सदिच्छा!

# वेदमाता गायत्री मंदिरात खंडेलवाल व माहेश्वरी समाजाच्या वतीने महाआरती



**जालना – प्रतिनिधी**

शारदीय नवरात्रोत्सव २०२६ निमित्त श्री गायत्री संस्थान, जालना येथील प्राचीन व प्रसिद्ध वेदमाता गायत्री मंदिरात भक्तिमय वातावरणात नवरात्रोत्सव साजरा करण्यात येत आहे. सोमवारी सकाळी खंडेलवाल समाजाच्या वतीने, तर सायंकाळी ७ वाजता माहेश्वरी समाजाच्या वतीने वेदमाता गायत्री मातेचे विधिवत पूजन करून सामूहिक महाआरती करण्यात आली. या दोन्ही महाआरतींना समाजबांधवांसह महिला व पुरुष भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते. गायत्री मातेच्या जयघोषाने मंदिर परिसर भक्तिमय झाला होता.

सकाळच्या सत्रात खंडेलवाल समाजाच्या वतीने आयोजित महाआरतीप्रसंगी गौरीशंकर खंडेलवाल, धर्मेश खंडेलवाल, बंकटलाल खंडेलवाल, मदनलाल खंडेलवाल, लक्ष्मीनारायण खंडेलवाल, कैलास खंडेलवाल, नंदकिशोर खंडवा, उमेश खंडेलवाल, संतोष खंडेलवाल आणि महेश खंडेलवाल, सुभाष तिवारी यांची उपस्थिती होती. यावेळी गायत्री संस्थानचे उपाध्यक्ष रामनिवास गौड यांच्या वतीने नवलकिशोर खंडेलवाल यांचे स्वागत करण्यात आले.सायंकाळी ७ वाजता माहेश्वरी समाजाच्या वतीने गायत्री मातेचे पूजन करून महाआरती करण्यात आली. या वेळी माहेश्वरी समाजाचे प्रदेश कोषाध्यक्ष संजय दाड, नेते विजय राठी, जिल्हाध्यक्ष दामोदर बजाज, जिल्हा सचिव दिलीप चेचाणी, गोपाल काबरा, लक्ष्मीनारायण मानधना, पुसाराम मुंदडा, रामप्रसाद मुंदडा, पूनमचंद जेथलिया, शिवप्रसाद गट्टानी आणि महेश सारडा यांच्यासह समाजबांधव उपस्थित होते.

# चित्रपट सृष्टीतील अवलिया अष्टपैलू : किशोर कुमार

हिंदी चित्रपट सृष्टीतील अवलिया व्यक्तिमत्त्व असलेले किशोर कुमार यांचा आज स्मृतिदिन. आजच्याच दिवशी म्हणजे १३ ऑक्टोबर १९८७ रोजी किशोर कुमार यांचे निधन झाले. किशोर कुमार हे हिंदी चित्रपट सृष्टीला लाभलेले अनमोल रत्न आहे. चित्रपट निर्मितीतील असे कोणतेच क्षेत्र नाही की ज्यात त्यांचा सहभाग नाही. पार्श्वगायक, संगीतकार, गीतकार, निर्माता, दिग्दर्शक, अभिनेता, पटकथा लेखक असे चित्रपट निर्मितीतील सर्वच प्रकारात त्यांनी मुक्त विहार केला. किशोर कुमार यांचे मूळ नाव आभास कुमार गांगुली असे होते. ४ ऑगस्ट १९२९ रोजी मध्यप्रदेशातील खांडवा येथे किशोर कुमार यांचा जन्म झाला. त्यांचे वडील कुंजलाल गांगुली हे वकील होते तर आई गौरादेवी या गृहिणी होत्या. त्यांचे थोरले बंधू अशोक कुमार आणि अनुप कुमार हे दोघेही हिंदी चित्रपट सृष्टीत नायक म्हणून कार्यरत होते. किशोर कुमार हे देखील आपल्या भावांप्रमाणे चित्रपट सृष्टीत नशीब आजमावण्यासाठी धडपडत होते. १९५० साली कुंजलाल गांगुली यांनी किशोर कुमार यांना मुक्कदर या चित्रपटात काम दिले. १९५२ ते १९६० या दरम्यान किशोर कुमार यांनी बऱ्याच चित्रपटात काम केले. नोकरी, अधिकार, धोबी डॉक्टर, ईलजाम, मिस माला, झलक हे चित्रपट त्यांनी १९५४ या एकाच वर्षात पूर्ण केले. १९५६ साली तर त्यांनी ९ चित्रपटात भूमिका केल्या. हा त्याकाळी एक विक्रम होता. त्यानंतर ते अभिनयासाठी गायनही करु लागले. अभिनय आणि गायन असा त्यांचा समांतर प्रवास सुरू झाला. किशोर कुमार यांनी आपल्या मिश्किल स्वभावाने चित्रपट सृष्टीत विनोदी भूमिकांचा नवा ट्रेंड आणला. अभिनय करताना गायन आणि संगीताचा तालावर थिरकने असा नवा ट्रेंड त्यांनी सुरू केला. किशोर कुमार यांच्या या नवीन स्टाईलने तरुणांना भुरळ घातली. त्याकाळातील सर्व दिग्गज नायिकांसोबत त्यांनी भूमिका केल्या. मधुबाला सोबत त्यांची जोडी विशेष जमली. अभिनयासोबत गायनातही ते यशस्वी होऊ लागले. त्यांची गाणी लोकप्रिय होऊ लागली. किशोर कुमार यांना संगीतकार सचिन देव बर्मन यांनी अनेक संधी दिल्या. सचिन देव बर्मन यांच्या संगीत दिग्दर्शनाखाली त्यांनी गायलेली सर्व गाणी लोकप्रिय झाली. पुढे सचिन देव बर्मन यांचे चिरंजीव राहुल देव बर्मन उर्फ पंचमदा यांच्याशी जोडी जमली या जोडीने अनेक लोकप्रिय गाणी चित्रपट सृष्टीला दिली. लता मंगेशकर आणि आशा भोसले यांच्यासोबत त्यांनी शेकडो गाणी गायली ती सर्व लोकप्रिय झाली. किशोर कुमार यांनी तीन दशकांहून आधीक काळ गायन केले. देव आनंद यांच्यापासून अनिल कपूर यांच्यापर्यंत सर्वच नायकांना त्यांनी आवाज दिला. किशोर कुमार यांचा आवाज ज्या नायकासाठी वापरला गेला तो नायक स्टार बनला. राजेश खन्ना यांना बॉलिवूडचा सुपरस्टार बनवण्यामागे किशोर कुमार यांचाही मोठा हात आहे. राजेश खन्ना यांच्या सर्व चित्रपटांमध्ये किशोर यांचाच आवाज वापरला गेला. आराधना पासून जमलेल्या या जोडीने पुढे इतिहास घडवला. या जोडीची सर्व गाणी हिट झाली. ज्या ज्या वेळी राजेश खन्ना यांचे नाव निघते त्या त्या वेळी किशोर कुमार यांचेही नाव घेतले जाते. किशोर कुमार यांनी ४०० हुन अधिक चित्रपटात शेकडो गाणी गायली ती सर्व लोकप्रिय झाली. नायक, गायक यासोबत ते दिग्दर्शकही होते. चलती का नाम गाडी यासारख्या विनोदी चित्रपटसोबतच दूर गगन की छाव मे यासारखा गंभीर चित्रपटही त्यांनी काढला. त्यांनी काही चित्रपटांना संगीतही दिले तर काही चित्रपटांसाठी गाणीही लिहिली. किशोर कुमार यांनी चित्रपटाच्या पटकथाही लिहील्या. असा हा हिंदी चित्रपट सृष्टीतील अवलिया अष्टपैलू १३ ऑक्टोबर १९८७ रोजी जगाला अलविदा करून कायमचा निघून गेला. किशोर कुमार यांच्या जादुई आवाजाची मोहिनी आजही कायम आहे. आजही त्यांची गाणी पूर्वीइतकीच लोकप्रिय आहेत. किशोर कुमार यांनी चित्रपट सृष्टीवर असा ठसा उमटवला आहे की त्यांच्या नावाशिवाय हिंदी चित्रपट सृष्टीचा इतिहास पूर्ण होऊ शकत नाही. किशोर कुमार यांना स्मृतिदिनी विनम्र अभिवादन!

**श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

### पुढे सपाट, मागे पुन्हा अतिक्रमण! जालन्यात मनपाच्या मोहिमेच्या परिणामकारकतेवर प्रश्नचिन्ह

# पाणिवेस ते राजमहल टॉकीज परिसरातील ५ ते ६ टपऱ्या व पत्र्यांचे शेड हटविले

## *मंठा चौफुलीवर अतिक्रमण हटाव मोहिमेनंतरही परिस्थिती ‘जैसे थे’?*

**जालना । प्रतिनिधी**

जालना शहरातील रस्ते मोकळे करणे, वाहतुकीला अडथळा ठरणारी अतिक्रमणे हटविणे आणि नागरिकांना पदपथांवरून सुरक्षितपणे चालता यावे, यासाठी महानगरपालिका प्रशासनाकडून सातत्याने अतिक्रमण हटाव मोहीम राबविण्यात येत आहे. मात्र, अतिक्रमण हटविल्यानंतर काही दिवसांनी त्याच ठिकाणी पुन्हा अतिक्रमणे उभी राहत असल्याचे चित्र दिसून येत असल्याने या मोहिमेच्या कायमस्वरूपी परिणामकारकतेबाबत प्रश्न उपस्थित होत आहेत. ‘पुढे सपाट, मागे पुन्हा अतिक्रमण’ अशी परिस्थिती निर्माण होत असेल, तर केवळ अतिक्रमणे हटवून चालणार नाही; ती पुन्हा होऊ नयेत, यासाठी प्रशासनाला प्रभावी यंत्रणा उभी करावी लागणार आहे.

जालना शहरातील मंठा चौफुली परिसरात महानगरपालिका प्रशासनाने यापूर्वी अतिक्रमण हटाव कारवाई केली होती. मात्र, त्यानंतर पुन्हा परिस्थिती ‘जैसे थे’ होत असल्याचे चित्र समोर येत आहे. त्यामुळे अतिक्रमण हटविण्याच्या मोहिमेचा प्रत्यक्ष फायदा किती काळ टिकतो, हा महत्त्वाचा प्रश्न निर्माण झाला आहे. शहरातील प्रमुख चौक, रस्ते आणि व्यापारी भागांत वाहतुकीचा प्रश्न गंभीर होत असताना अतिक्रमण हटविण्याबरोबरच त्यावर नियमित नियंत्रण ठेवण्याची गरज अधोरेखित होत आहे.

**पाणिवेस ते राजमहल टॉकीजपर्यंत धडक कारवाई**

दरम्यान, सोमवार, १२ ऑक्टोबर रोजी महानगरपालिका आयुक्त अंजली शर्मा यांच्या निर्देशानुसार पाणिवेस ते राजमहल टॉकीज परिसरात अतिक्रमण हटाव मोहीम राबविण्यात आली. या कारवाईत सार्वजनिक रस्ते, पदपथ आणि वाहतुकीस अडथळा निर्माण करणाऱ्या अनधिकृत बांधकामांवर कारवाई करण्यात आली. परिसरातील सुमारे पाच ते सहा टपऱ्या आणि पत्र्यांचे शेड हटविण्यात आल्याची माहिती महानगरपालिका प्रशासनाने दिली.या कारवाईमुळे संबंधित परिसरातील रस्ते आणि पदपथ मोकळे होण्यास मदत झाली. नागरिकांची ये-जा सुलभ व्हावी आणि वाहनचालकांना वाहतुकीतील अडथळ्यांचा सामना करावा लागू नये, हा या मोहिमेमागील उद्देश आहे. सहाय्यक आयुक्त विजय फुलंब्रीकर यांच्या उपस्थितीत ही कारवाई करण्यात आली. यावेळी



अतिक्रमण विभागप्रमुख शोएब खान, कादर खान, उत्तम लाडाणे, हरिचंद्र लोखंडे, रवींद्र पवार यांच्यासह अतिक्रमण विभाग, स्वच्छता विभाग, सुरक्षा पथकातील कर्मचारी आणि इतर अधिकारी उपस्थित होते. महानगरपालिकेच्या या कारवाईमुळे पुन्हा एकदा अतिक्रमणधारकांना स्पष्ट संदेश देण्यात आला आहे. मात्र, अशा कारवायांचा परिणाम केवळ त्या दिवसापुरता मर्यादित न राहता संबंधित परिसर कायमस्वरूपी अतिक्रमणमुक्त राहतो का, यावरच मोहिमेचे खरे यश अवलंबून असणार आहे.

**मंठा चौफुलीचा अनुभव; कारवाईनंतर पुन्हा तीच परिस्थिती?**

अतिक्रमण हटविण्याच्या मोहिमेतील सर्वांत महत्त्वाचा मुद्दा म्हणजे कारवाईनंतरची परिस्थिती. मंठा चौफुली परिसरात अतिक्रमणे हटविल्यानंतर पुन्हा अतिक्रमणाची परिस्थिती निर्माण होत असल्याचे दिसत असल्याने प्रशासनाच्या देखरेखीबाबत प्रश्न उपस्थित होत आहेत. अतिक्रमण हटविण्यासाठी मनुष्यबळ, यंत्रसामग्री आणि वेळ खर्च केला जातो. कारवाईनंतर काही काळ रस्ता मोकळा होतो; मात्र पुन्हा टपऱ्या, हातगाड्या किंवा इतर अनधिकृत रचना उभ्या राहत असतील, तर आधीच्या कारवाईचा अपेक्षित परिणाम किती काळ टिकला, याचा आढावा घेणे आवश्यक ठरते. अतिक्रमण हटविणे ही एकदाच करून संपणारी प्रक्रिया नाही. त्यासाठी नियमित पाहणी, नव्याने अतिक्रमण होऊ न देणे, संबंधितांवर नियमानुसार कारवाई आणि विभागीय पातळीवर जबाबदारी निश्चित करणे आवश्यक असते. अन्यथा, एका ठिकाणी अतिक्रमण हटविले जात असताना दुसऱ्या ठिकाणी नव्याने अतिक्रमणे वाढण्याची शक्यता कायम राहते.

अतिक्रमण हटविण्याच्या कारवाईनंतर संबंधित जागेवर पुन्हा अतिक्रमण होऊ न देणे, हेच प्रशासनासमोरील खरे आव्हान आहे. मंठा चौफुली परिसरातील परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर पाणिवेस ते राजमहल टॉकीज परिसरातील कारवाईनंतरही अशीच पुनरावृत्ती होणार नाही, यासाठी मनपा प्रशासनाला विशेष दक्षता घ्यावी लागणार आहे.

**केवळ अतिक्रमण हटवून उपयोग नाही; सातत्यपूर्ण देखरेख हवी**

शहरातील सार्वजनिक रस्ते, पदपथ आणि चौक हे नागरिकांच्या वापरासाठी आहेत. त्यांवर अनधिकृतपणे टपऱ्या, शेड किंवा इतर बांधकामे उभी राहिल्यास पादचाऱ्यांना रस्त्यावरून चालावे लागते. त्यामुळे वाहतुकीला अडथळा निर्माण होण्याबरोबरच अपघाताचा धोकाही वाढू शकतो. व्यापारी भागांमध्ये वाहनांची वर्दळ, ग्राहकांची ये-जा आणि पार्किंगची समस्या लक्षात घेता अतिक्रमणाचा प्रश्न केवळ सौंदर्यीकरणापुरता मर्यादित राहत नाही; तो थेट नागरी सुविधांशी संबंधित ठरतो. महानगरपालिकेने प्रमुख मार्ग आणि चौकांची नियमित पाहणी करून अतिक्रमणांची स्थिती नोंदविणे आवश्यक आहे. एखाद्या ठिकाणी कारवाई झाल्यानंतर त्या जागेची पुन्हा तपासणी करण्यासाठी निश्चित कालावधी ठरविता येईल. नव्याने अतिक्रमण आढळल्यास नियमानुसार तातडीने कारवाई केली, तर वारंवार मोठ्या मोहिमा राबविण्याची वेळ कमी होऊ शकते.

याशिवाय, अतिक्रमण हटविण्यात आलेल्या ठिकाणांची नोंद ठेवून संबंधित विभागाच्या माध्यमातून नियमित निरीक्षण करणे, आवश्यकतेनुसार सुरक्षा किंवा प्रतिबंधात्मक उपाययोजना करणे आणि नागरिकांच्या तक्रारींवर त्वरित कार्यवाही करणे, यामुळे मोहिमेला सातत्य मिळू शकते.

**मनपाचा इशारा कठोर; अंमलबजावणी किती प्रभावी?**

महानगरपालिका प्रशासनाने अतिक्रमण हटविण्यात आलेल्या ठिकाणी पुन्हा अतिक्रमण आढळल्यास संबंधितांवर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील लागू तरतुदींनुसार कायदेशीर कारवाई केली जाईल,

तसेच अतिक्रमण हटविण्यासाठी झालेला खर्च संबंधितांकडून वसूल केला जाईल, असा इशारा दिला आहे.

सार्वजनिक जागेवरील अनधिकृत अतिक्रमण रोखण्यासाठी हा इशारा महत्त्वाचा असला, तरी त्याची प्रभावी अंमलबजावणी होणे तितकेच आवश्यक आहे. अतिक्रमण हटविण्याची कारवाई झाल्यानंतर पुन्हा त्याच ठिकाणी अतिक्रमण झाले, तर केवळ नव्याने मोहीम राबविण्याऐवजी पुनरावृत्ती का झाली, याचाही आढावा घेतला पाहिजे.

अतिक्रमण हटविण्यासाठी झालेल्या खर्चाची वसुली करण्याबाबत प्रशासनाने दिलेल्या इशाऱ्याची अंमलबजावणी किती प्रकरणांत होते, पुन्हा अतिक्रमण करणाऱ्यांवर काय कारवाई केली जाते आणि कारवाईनंतर संबंधित जागा किती काळ मोकळी राहते, याबाबत पारदर्शक माहिती उपलब्ध झाल्यास मोहिमेच्या परिणामकारकतेचे मूल्यमापन करणे शक्य होईल.

**अतिक्रमणधारकांवर कारवाईसोबत पर्यायी व्यवस्थेचाही विचार आवश्यक**

शहरातील सार्वजनिक जागांवरील अनधिकृत अतिक्रमणांना समर्थन देता येणार नाही. मात्र, हातगाडीधारक आणि लहान व्यावसायिकांच्या उपजीविकेचा प्रश्नही प्रशासनाने कायदेशीर चौकटीत विचारात घेणे आवश्यक आहे. सार्वजनिक रस्ते आणि पदपथ मोकळे ठेवण्याची गरज कायम राखून, लागू नियमांनुसार पात्र फेरीवाल्यांसाठी योग्य जागा आणि नियोजनबद्ध व्यवस्था उपलब्ध करण्याचा विचार केल्यास अतिक्रमणाची पुनरावृत्ती रोखण्यास मदत होऊ शकते. रस्ते मोकळे ठेवणे आणि नागरिकांना सुरक्षित वाहतूक सुविधा देणे ही महानगरपालिकेची महत्त्वाची जबाबदारी आहे. त्याचवेळी नियमांचे पालन करून व्यवसाय करणाऱ्यांना आणि पात्र फेरीवाल्यांना लागू धोरणानुसार व्यवस्था उपलब्ध करून देणे, हा दीर्घकालीन उपायाचा भाग ठरू शकतो.

**शहर अतिक्रमणमुक्त होणार की मोहिमा सुरूच राहणार?**

जालना शहरात अतिक्रमण हटाव मोहिमेला गती देण्याचा मनपा प्रशासनाचा प्रयत्न स्वागतार्ह असला, तरी मोहिमेचे यश मोजताना हटविलेल्या टपऱ्या किंवा शेडची संख्या एवढाच निकष पुरेसा ठरणार नाही. कारवाईनंतर संबंधित परिसर किती दिवस अतिक्रमणमुक्त राहिला, वाहतुकीतील अडथळे कायमचे दूर झाले का आणि पुन्हा अतिक्रमण करणाऱ्यांवर प्रभावी कारवाई झाली का, या प्रश्नांची उत्तरे महत्त्वाची आहेत.

पाणिवेस ते राजमहल टॉकीज परिसरातील ताज्या कारवाईनंतर आता या जागेवर पुन्हा अतिक्रमण होऊ नये, यासाठी प्रशासन काय उपाययोजना करते, याकडे नागरिकांचे लक्ष राहणार आहे. मंठा चौफुली परिसरातील अनुभव लक्षात घेता, केवळ धडक कारवायांऐवजी नियमित देखरेख आणि सातत्यपूर्ण अंमलबजावणीवर भर देण्याची गरज आहे.

अतिक्रमण हटविणे ही मोहिमेची सुरुवात; ते पुन्हा होऊ न देणे हेच खरे यश! ‘पुढे सपाट, मागे पुन्हा अतिक्रमण’ हे चित्र बदलून जालना शहरातील रस्ते आणि पदपथ कायमस्वरूपी मोकळे ठेवण्याचे आव्हान महानगरपालिका प्रशासन कसे पेलते, हे आगामी काळात स्पष्ट होईल.



जालना शहरातील मंमादेवी मंदिर येथे नवरात्र उत्सव निमित्त अशी आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली होती (छायाचित्र जावेद तांबोली )

# माहोरा येथील जिल्हा परिषद प्रशालेत सेवा संकल्प सप्ताहाचे उत्साहात आयोजन

**जालना - प्रतिनिधी**

सेवा संकल्प अभियान सप्ताह अंतर्गत् जाफ्राबाद तालुक्यातील जिल्हा परिषद प्रशाला माहोरा येथे शाळा स्तरावर विविध उपक्रमांचे यशस्वी आयोजन करण्यात आले होते. या अभियाच्या माध्यमातुन विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी व समाजोपयोगी मूल्यांच्या रुजवणुकीसाठी विविध कार्यक्रम पार पडले.

यामध्ये दि.२६ सप्टेंबर रोजी विद्यार्थ्यांना सेवा संकल्प अभियानाची पार्श्वभूमी



सांगून सप्ताहात राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांची सविस्तर माहिती देण्यात आली. यामध्ये दि.२७ सप्टेंबर रोजी वृक्षारोपणाचे महत्त्व व गरज प्रतिपादन करून, देशी प्रजातीचे वृक्ष तसेच विविध जैवविविधतेसाठी आवश्यक वनस्पती व औषधी वनस्पतींची लागवड करून त्यांचे संवर्धन करण्याचे आवाहन करण्यात आले. दि.२८ सप्टेंबर रोजी शाळा स्तरावर विविध क्रीडा स्पर्धांचे आयोजन करून क्रीडा क्षेत्रातील संधी व महत्त्व पटवून देण्यात आले. तसेच विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी करून आरोग्यविषयक जागरूकता निर्माण करण्यात आली. *(पान २ वर)*

# मत्स्योदरी अभियांत्रिकीच्या संगणक विभागामध्ये विद्यार्थी परिषदेची स्थापना

**जालना - प्रतिनिधी**

शहरातील मत्स्योदरी शिक्षण संस्थेच्या अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालयाच्या संगणक विज्ञान व अभियांत्रिकीच्या विद्यार्थी परिषदेचे उदघाटन नुकतेच करण्यात आले. याप्रसंगी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे सहाय्यक प्राध्यापक डॉ. सतीश भालशंकर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. यावेळी डॉ. सतीश भालशंकर यांनी प्रॉम्प्ट इंजिनीअरिंग या विषयावरही मार्गदर्शन केले. कृत्रिम बुद्धिमत्तेच्या () युगात प्रभावी प्रॉम्प्ट तयार करण्याचे महत्त्व, कडून अचूक व उपयुक्त उत्तरे मिळवण्याच्या पद्धती आणि शिक्षण व तंत्रज्ञान क्षेत्रातील प्रॉम्प्ट इंजिनीअरिंग चा उपयोग याविषयी त्यांनी माहिती दिली.

यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य व कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ .एस. के. बिरादार यांनी विद्यार्थ्यांना नवनवीन तंत्रज्ञान आत्मसात करण्याबरोबरच टीम वर्क आणि




नेतृत्व गुण वाढवावे असे प्रतिपादन या वेळी केले.

तसेच या प्रसंगी कोडिंग ,डिबगिंग,ट्रेजर हंट विविध स्पर्धा घेण्यात आल्या . विजेत्यांचे आणि टॉपर्स चे बक्षीस वितरण मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

याप्रसंगी संगणक विज्ञान विद्यार्थी परिषेदेचे सरचटणीस शंतनू गुजर ,कु. निकिता राऊत, कु.पूर्वा यादव ,कु. निकिता फुके, कु. पूजा राऊत, नंदकिशोर मुंडे, कु. लक्ष्मी भुसे, श्रेयश पाऊलबुद्धे ,कु.रुचिता झवर ,विजय चव्हाण,कु शिवकन्या एखंडे, कु. स्वराली देशमुख,भाग्यवंत सोनुने,कु.श्रेया बत्तीन,कु.आश्लेषा पवार यांचा शपथविधी पार पडला. यावेळी संगणक विभाग प्रमुख प्रा. एस. एन. गिते, समन्वयक प्रा. रुही सोडानी, प्रा. गजानन चाकोते,प्रा. मंदा कळकुंबे, प्रा.कुणाल देशमुख, प्रा.राजश्री मद्दलवार, प्रा. धनंजय देशमुख व विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रांचालन वैष्णवी पिंपळे आणि रुचिता झवर यांनी केले.

# चंदनझिरा येथील शिक्षक मिलिंद पंडागळे यांना ‘राष्ट्रीय आदर्श शिक्षक पुरस्कार २०२६’ ने सन्मानित

**परतूर - प्रतिनिधी**

कै. नानासाहेब पाटील प्राथमिक विद्यालय, चंदनझिरा येथील उपक्रमशील सहशिक्षक, मिलिंद नारायणराव पंडागळे यांना त्यांच्या उल्लेखनीय व गुणवत्तापूर्ण शैक्षणिक कार्याबद्दल *‘राष्ट्रीय आदर्श शिक्षक पुरस्कार २०२६’* प्रदान करून गौरविण्यात आले. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी आणि नाविन्यपूर्ण अध्यापन पद्धतीसाठी त्यांनी दिलेले योगदान अत्यंत प्रेरणादायी आहे. या कार्याची दखल घेऊन त्यांना या राष्ट्रीय पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.




हा पुरस्कार सोहळा मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न झाला. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून *मा. ना. संजय शिरसाट (सामाजिक न्याय मंत्री तथा पालकमंत्री, छत्रपती संभाजीनगर), मा. किशोर सीतोळे (भाजप जिल्हाध्यक्ष), मा. नंदकुमार घोडेले (माजी महापौर, छत्रपती संभाजीनगर)* आदी मान्यवर उपस्थित होते. या राष्ट्रीय पुरस्काराचे प्रस्तुतकर्ता मा. निलेश साबे Founder & CEO, Swift N Lift, पुणे यांच्या वतीने हा गौरव करण्यात आला. या अभिमानास्पद सन्मानाबद्दल श्री. मिलिंद पंडागळे यांच्यावर सर्व स्तरातून, शिक्षकवृंद, मित्रपरिवार आणि हितचिंतकांकडून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282
Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886
E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.